## प्रकरण तिसरे

# श्राविकाश्रमाची स्थापना, विकास व वाढ

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## प्रकरण तिसरे

# श्राविकाश्रमाची स्थापना, विकास व वाढ

१९ व्या शतकातील समाज सुधारकांच्या प्रयत्नाने भारतभर समाजसुधारकांचे लक्ष, स्त्री विषयक प्रश्न, रुढी व परंपरेच्या गर्तेत अडकलेल्या स्त्रिया आणि त्यांना यातून बाहेर काढण्यासाठी शिक्षण देणे हा एकच मार्ग आहे, याकडे वेधले व राजाराम मोहनरॉय व ब्राह्मो समाजाने केलेले स्त्री शिक्षण विषयक कार्य, प्रार्थना समाजाच्या सुधारकाच्या मूळे मुंबईमध्ये सुरू झालेली स्त्री शिक्षणाची चळवळ, आर्यसमाजाने स्त्री सुधारणा विषयक मांडलेले विचार यातून स्त्रियांच्या प्रश्नाविषयक चळवळी महाराष्ट्रभर सुरू झाल्या. महात्मा जोतिबा फुलेंनी आपली पत्नी सावित्रीबाई हिला शिक्षण देऊन पुण्यामध्ये शाळा काढण्यास उद्युक्त केले. १९ व्या शतकाच्या मध्यावर पुण्यामध्ये चालू झालेली स्त्री शिक्षणाची ही चळवळ १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोल्हापूर आणि इतर दक्षिणी संस्थानात पसरली. स्त्रियांनीही पुरूषांबरोबर समाज जीवनात भाग घेतला पाहिजे याची जाणीव भारतीय पुरूषांना ब्रिटीशांच्या सहवासामुळे निर्माण झाली त्यामुळे आपल्या स्त्रियांचे मागासलेपण हे समाज जीवनाच्या प्रगतीमधील फार मोठा अडसर आहे, याची जाणीव आंग्लशिक्षित भारतीय पुरूषांच्यात निर्माण झाली त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न आणि त्यावर उपाय यासाठी समाजसुधारकांनी बरेच विचार मांडले. महाराष्ट्रात सुरू झालेली अनेक वृत्तपत्रे त्यातून झालेली उलटसुलट चर्चा यामुळे सर्व समाजातील शिक्षित पुरूषांना आपल्या समाजातील स्त्रिया मागे राहू नयेत. यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. याची जाणीव झाली.

३ एप्रिल १८९९ ला स्तवनिधी येथे झालेल्या द. भा. जैन सभेच्या अधिवेशनात या गोष्टीची दखल घेतली गेली. दरवर्षी विशाळी अमावसेच्या यात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील

कोल्हापूर, बेळगाव, सांगली, धारवाड या जिल्ह्यातून स्तवनिधी या ठिकाणी जैन महिला प्रचंड संख्येने उपस्थित रहात. या स्त्रिया फक्त धार्मिक उद्देशानेच आपल्या कुटुंबियाबरोबर येथे येत असत. अशा स्त्रियांमध्ये आधुनिक विचारसरणी व सुधारणावादी विचारांचे लोण, सहज पसरवणे शक्य ाहे. याची जाणीव द. भारत जैन सभेच्या, नेतृत्वाला झाली. सभेच्या कार्यकर्त्यांनी अगदी पहिल्या अधिवेशनातही स्त्रियांना स्वतंत्र मिटींग घेण्यास व प्रश्न मांडण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे ही पहिली मिटींग मध्येच जैन महिला परिषद या संघटनेची सुरूवात झाली. दरवर्षी भरणाऱ्या वार्षिक अधिवेशनामध्ये महिलांना एकत्र करून त्यांचे प्रश्न मांडण्यास व त्यावर उपाय योजना करण्यास भाग पाडावे या उद्देशाने महिला परिषद हा सभेच्या वार्षिक अधिवेशनाचा महत्त्वपूर्ण भाग ठरला.[१]

द. महाराष्ट्रातील जैन स्त्रियांच्या सामाजिक उन्नतीच्या मार्गातील पहिली अडचण म्हणजे निरक्षरता होय. सर्व सुधारणांचा पाया शिक्षण आहे व साक्षरता ही शिक्षणाची पहिली पायरी आहे. म्हणून साक्षरतेचा प्रसार करण्याबद्दल जाणिवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे याची जाणीव जैन समाजाला १९ व्या शतकाच्या दशकात सामाजिक व पुनरुज्जीवनवादी चळवळीमुळे आली होती. खालील तक्त्यातील आकडे जैन लोकातील साक्षरता, शिक्षण आणि इंग्रजी शिक्षण या विषयीचे प्रमाण दर्शविते.[२]

जैन पुरूष शिक्षण (१८९१ ते १९०१)

| सन | १८९१ | १९०१ |
|---|---|---|
| मुंबई इलाखा | ९९ | ११५ |
| ब्रिटीश राज्य | १०२ | ११३ |
| देशी संस्थाने | ९२ | १२१ |

जनगणना रिपोर्ट - १८९१ ते १९०१

संदर्भ - प्रगती आणि जिनविजय ४-१-१९२३

वरील आकडे दर एक हजारी लिहता वाचता येणाऱ्या जैन पुरूष वर्गाचे आहेत. याखाली जैन स्त्री शिक्षणाचे आकडे दिले आहेत.

**जैन स्त्री शिक्षण (१८९१ ते १९०१)**

| | १८९१ | १९०१ |
|---|---|---|
| मुंबई इलाखा | ०५ | ०९ |
| ब्रिटीश राज्य | ०६ | १० |
| देशी संस्थाने | ०४ | ०७ |

जनगणना रिपोर्ट - १८९१ ते १९०१

संदर्भ - प्रगती आणि जिनविजय ४-१-१९२३

वरील आकडे जैन समाजातील १८९१ व १९०१ मधील साक्षरतेचे प्रमाण ठरवितात. पुरूषांमध्येच शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने स्त्रियामध्ये हे प्रमाण जास्त असण्याची सूतराम शक्यता तत्कालीन परिस्थितीत नव्हती त्यामुळे स्त्रियांना विविध प्रकारच्या सुखसोयी स्वतंत्र स्त्री शिक्षण संस्था काढून हे प्रमाण वाढविणे गरजेचे होते. व्यावहारीक शिक्षणाबरोबरच स्त्रियांना व्यापक अर्थाने व्यवहारिक शिक्षण दिले पाहिजे असाही एक प्रवाह त्याकाळी प्रभावी होता. त्यामुळे शरीर मन बुद्धी यांचा विकास होऊन, आपले घराणे, समाज, देश याबद्दल त्यांच्या मनात जाणीव निर्माण होईल. हा स्वातंत्र चळवळीच्या सुरवातीच्या काळातील स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोन होता. तसेच मातृत्वाची अत्यंत महत्वाची जबाबदारी समाजातील महिला वर्गावर असल्याने भावी काळासाठी चांगली पिढी निर्माण होण्यासाठी स्त्रीयांच्या ज्ञानाचा उपयोग करणे; शिक्षणाच्या योगाने मन सुसंस्कृत होऊन कुटुंब व समाज यांच्याबद्दलचे कर्तव्य स्त्रीला सहज पार पाडता यावे या उद्देशाने समाजसुधारक स्त्री शिक्षणाकडे पहात होते.[३]

मुंबई पुण्याच्या तुलनेत स्त्री शिक्षणाबाबतीत दक्षिण महाराष्ट्र अत्यंत मागासलेला होता. २६ व्या शतकाच्या सुरवातीला शिक्षित स्त्रियांची संख्य अत्यल्प होती याची जाणीव छत्रपती शाहूंना होती. कोल्हापूर प्रांतातील स्त्रियांची झालेली शिक्षणविषयक हेळसांड व असलेली सत्यस्थिती ही भावी काळाच्या दृष्टीने अत्यंत हानीकारक आहे याची जाणीव झाल्याने कोल्हापूरात स्त्री शिक्षणाला उत्तेजन देण्याचे छत्रपती शाहू महाराज यांनी ठरविले विद्यार्थीनीकरिता स्वतंत्र हायस्कुल सरू करून तेथे विनामूल्य शिक्षण देण्याची व्यवस्था त्यांनी केली. पण त्याशिवाय कॉलेजमध्ये जाऊन उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सर्व प्रकारची फी माफी केली. या स्त्री शिक्षणविषयक सवलतीचा लाभ मुंबई इलाख्यातीलच नव्हे तर इतर ठिकाणच्या विद्यार्थीनीही कोल्हापुरात येऊन घेऊ लागल्या.[४] मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्या शिक्षणालाही छ. शाहू महाराजांनी प्रोत्साहन दिले. वेगवेगळ्या प्रकारची पारितोषिक व शिष्यवृत्या देऊ केल्या. त्यामुळे कोल्हापूर संस्थानात १९१४ मध्ये वेगवेगळ्या शिक्षण संस्थातून २२७१ मुली शिकत होत्या आणि मुलींच्या शिक्षणावर १०,८४७ रु. इतका खर्च कला जात होता.[५]

छ. शाहू महाराज यांना त्यांच्या वसतिगृह चळवळीच्या कार्यात भास्करराव जाधव, आ. लठ्ठे आणि महादेव कृष्ण डोंगरे हे मदत करत होते. १९११ ला. कोल्हापूर सत्यशोधक समाजाची स्थापना आ. लठ्ठे अधिक्षक असलेल्या द. भारत जैन सभेच्या दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापुर येथे झाली होती.[६] महात्मा जोतिबा फुलेंचे स्त्री शिक्षण व मागासवर्गीय स्त्री शिक्षण यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन हे सर्व कार्यकर्ते कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करत होते. आ. लठ्ठे हे कोल्हापूर संस्थानचे शिक्षणमंत्री म्हणूनही १९११-१४ कार्यरत होते. श्री लठ्ठे हे दक्षिण भारत जैन सभेच्या सुरवातीच्या काळापासून मार्गदर्शक व कार्यकर्ते म्हणून सक्रिय होते.[७] साहजीकच महात्मा जोतिबा फुलेचे विचार व कार्य आणि छ. शाहूंचे स्त्री शिक्षणाला दिलेले प्रोत्साहन याचा परिणाम त्यांच्यावर असल्याने त्यांनी दक्षिण

भारत जैन सभा अंतर्गत चालू झालेल्या स्त्री सुधारणा विषयक चळवळी आणि स्त्री शिक्षण याला प्राधान्याने मार्गदर्शन दिले होते. यामुळेच १८९९ च्या अधिवेशनात सभेचे कार्यकर्ते आदिराज देवेंद्र उपाध्ये यांच्या पत्नी गोंदूबाई उपाध्ये जिचा १९०१ च्या कोल्हापूर स्टेट रिपोर्टमध्ये लिहता वाचता येणारी एकमेव जैन स्त्री म्हणून उल्लेख झाला होता. अशा गोंदूबाईना सभेच्या कार्यकर्त्यांनी स्त्री शिक्षण कार्य करण्यास प्रवृत्त केले.[८]

सौ. गोदुबाई उपाध्ये १८९९ च्या दक्षिण भारत जैन सभेच्या पहिल्या अधिवेशनात स्त्रियांना शिक्षण घेण्यासाठी मार्गदर्शन करताना म्हणाल्या, "स्त्रीशिक्षण हे मड्डमांचे अनुकरण आहे, असे मुळीच नाही. पूर्वी आमच्यातसुद्धा स्त्री शिक्षण झपाट्याने सुरू होते तसे प्राचीन ग्रंथावरून स्पष्ट दिसते. अनंतमती, चेळणादेवी ही स्त्री रत्ने चांगली शिकलेली होती. पुष्कळ अर्जिका व आचार्यांच्या कन्याभगिनी पूर्ण विद्यासंपन्न असून, त्या गावोगाव धर्मोपदेश करत फिरत असत. जैन राजे आपल्या बायकामुलांना शास्त्रपुराण, स्तुतिस्तोत्रे वगैरे शिकविण्याकरिता स्वतंत्र शिक्षक नेमीत असत. ही प्राचीन काळची गोष्ट झाली. पुढे मुसलमानांचा अंमल बसला, तेव्हा इकडे-तिकडे अंदाधुंदी सुरू झाली; व ते कडवे लोक आम्हा गरीब गाईंना नानाप्रकारे त्रास देऊं लागले. सबब आम्ही त्यांच्या दृष्टीस पडू नये म्हणून आम्हास पडद्यातच लपून राहणे भाग पडे-मग कुठली विद्या आणि कुठले काय? त्या दिवसापासून आमच्या शिक्षणाविषयी आमच्या पुरूष मंडळींची मने हळूहळू बदलत चालली आणि आजला ती इतकी बदलली आहेत की, स्त्रियांना विद्या शिकविली तर त्या सरळ मार्गाने चालणार नाहीत; पतीला बगलेत मारून आपणच कारभार करतील; विनयादि गुणाला लाथ झाडून साऱ्या संसारात माती कालवतील अशी पुष्कळांची दृढ समजूत झालेली दिसते. पण बंधुभगिनींनो, मी आपल्याला खचित सांगत्यें की, अमृतात जसे विष सापडावयाचे नाही तसे चांगल्या विद्येचा परिणाम कदापि वाईट व्हावयाचा नाही. काही शिकलेल्या बायका सरळ वागल्या नाहीत असे आपणांपैकी कित्येक म्हणतील. त्यास माझे एवढेच सांगणे आहे

की, त्या अबलांवर सुविद्येचा संस्कार परिपूर्ण झाला नव्हता; त्या केवळ अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या झाल्या होत्या. असेच समजले पाहिजे कारण ''उथळ पाण्याला खळखळाट फार'' या म्हणीप्रमाणे अल्प विद्येचा परिणाम भयंकर व्हावयाचा. न मुरलेले लोणचे आंबट लागत नाही काय? अपक्व अन्न विकार करीत नाही काय? आता उलट पक्षी कहा की, जिच्या अंतःकरणात सुविद्येची मूलतत्त्वे चांगली बिंबली आहेत, ती माऊली आपल्या प्रौढ व पवित्र आचरणाने समाजाला प्रत्येक गोष्टीत चांगली मदत करून एकट्या इहलोकीच धन्य धन्य म्हणवून घेईल इतकेच केवळ नव्हे, तर परलोकीसुद्धा मोक्षसुखाचा अलभ्य लाभ मिळवील, यात संशय नाही. असे जिनसेनाचार्य म्हणतात, ''पुष्कळ गोष्टीत सुशिक्षित गृहस्थापेक्षा सुशिक्षित गृहिणीची किंमत मोठी आहे.'' हे खरे आहे. म्हणून बंधुभगिनींनो, मी असा ठराव पुढे आणत्यें की,

''जैनांमध्ये स्त्री शिक्षणाचा प्रसार होणे या समाजाला अत्यंत जरूर वाटते म्हणून स्त्री शिक्षणाबद्दल योग्य मार्गाने चळवळ करण्यास समाज शक्तीप्रमाणे प्रयत्न करील.''

वरील सर्व गोष्टीचा साकल्याने विचार करून १९०३ सालच्या व १९०४ सालच्या १९०४ सालच्या दक्षिण भारत जैन सभेच्या वार्षिक अधिवेशनाच्या आवश्यकतेवर भर दिला, व स्त्री शिक्षणासंबंधी पुढील ठराव मांडला.[८]

''प्रत्येक जैन ग्रहस्थ आपल्या कुटूंबातील स्त्रियांना शक्य त्या रितीने धार्मिक व व्यावहारीक शिक्षण देईल अशी सभेस उमेद आहे. धर्मासंबंधी माहिती मिळवण्यास पुस्तकाशिवाय दुसरे साधन नाही, लिहणे, वाचणे, हिशोब ठेवणे यासाठी स्त्री शिक्षणाची गरज आहे. त्यासाठी स्त्री शिक्षण वाढविण्याबद्दल सर्वांनी विचार करावा.'' आणि त्यासाठी स्वतंत्र स्त्री शिक्षण विभागाची सुरवात केली.[९]

१९०५ च्या अधिवेशनात कोल्हापूर हॉस्पिटलमधील स्त्री शाखेच्या प्रमुख डॉक्टर कृष्णाबाई केळवकर या तज्ञ स्त्री डॉक्टरांचे 'स्त्रीयांचे कर्तव्ये' यावर व्याख्यान ठेवले या समारंभासाठी १५०० स्त्रिया व १००० पुरूष हजर होते.[१०]

द. भा. जैन सभा १९०५-०६ दरम्यान जैन स्त्रीयामध्ये स्त्री शिक्षणविषयक जागृती करण्यात यशस्वी झाली. त्यामुळे १९०६ ला द. भारत जैन सभेच्या पाडलेल्या वेगवेगळ्या विभागामध्ये 'स्त्री शिक्षण विभाग' हा स्वतंत्र विभाग स्थापन होऊन त्यांचे काम श्री लट्टे यांच्याकडे सोपवण्यात आले.[११] याचवेळी स्त्री शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण गोष्ट घडून आली. ती म्हणजे जैन बोर्डिंगच्या कामामध्ये सक्रिय सहभाग होणारे माणिकचंद हिराचंद यांची विधवा मुलगी मगनबाई ही १९०६ च्या परिषदेला हजर राहिल्या. त्यांनी केलेल्या स्त्री शिक्षणविषयक भाषणाने स्त्रियांच्यात जागृती निर्माण झाली त्यामध्ये रा. सा. पाटील यांच्या भगिनी सौ. रत्नाबाई, रा. लेंगडे यांच्या सूनबाई, सौ. सलुबाई या प्रभावित झाल्या एका वृद्ध स्त्रीने सर्व स्त्रियांना असा उपदेश केला की 'आपले सर्व दागिने मोडा पण सभेच्या स्त्री शिक्षणाला मदत करा.' याचा परिणाम होऊन १९०६ च्या अधिवेशनात स्त्रीयांनी ३००/- रु. ची रक्कम सभेकडे सुपूर्द केली. याचा परिणाम जमलेल्या पुरूषांवर होऊन त्यांनी हे पैसे स्त्री शिक्षणासाठीच खर्च करण्याचे ठरवले त्यासाठी श्री लठ्ठे यांच्या मदतीला भालचंद्र नाना सुलताने यांची नेमणूक केली.[१२]

## जैन श्राविकाश्रम कोल्हापूर १९०८ :

दक्षिण भारत जैन सभेच्या स्त्री शिक्षण विभागाने २५/१/१९०६ ला स्त्री शिक्षणविषयक एक निवेदन जाहीर केले होते. ते पुढीलप्रमाणे ''कुलीन जैन विधवा अथवा विवाहित बायकांना विद्याअभ्यासाकरिता ३ स्कॉलरशीप देणे आहे. घेणारीने सभेच्या पसंतीप्रमाणे सभेने ठरविलेल्या नियमान्वये अभ्यास करून सभेने ठरविलेल्या ठिकाणी योग्य

पगारावर जैन स्त्रियांना शिकवण्याचे काम पाच वर्ष तरी केले पाहिजे ही अट मान्य असल्याबद्दल स्वत: व पालक यांच्यामध्ये अर्ज करावा. अर्जासोबत कुलीनतेबद्दल, ग्रह स्थितीबद्दल, वयाबद्दल व कोठपर्यंत शिक्षण झाले आहे याबद्दल दाखले पाठवावेत. गावोगावी शाळा शिकून मराठी दुसरी अगर त्यापुढे इयत्ता पास झालेल्या मुलींना बक्षिसे मिळतील त्यासाठी दाखल्यासह अर्ज करावे.''[१३]

स्त्रीयांना फक्त स्कॉलरशीप देऊन त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण वाढणार नाही तर मुलांप्रमाणे मुलींना व स्त्रियांना शहरामध्ये राहून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. या जाणिवेने दिगंबर जैन वसतिगृह कोल्हापूरप्रमाणेच महिलांचे एखादे वस्तीगृह सुरू करावे हा विचार पुढे आला. माणिकचंद शेठच्या कन्या असा प्रयत्न सुरत मुंबई येथे करत होत्या. फक्त मुलींनाच शिक्षण देण्यापेक्षा बालविधवा निराश्रीत व परित्यक्ता जैन स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांचा स्त्री शिक्षणाच्या कामी उपयोग करून घेणे गरजेचे आहे. याची आवश्यकता सभेच्या कार्यकर्त्यांना पटली. या पाठीमागे आणखी एक विचार होता. बालविवाहाच्या प्रथेमुळे बालविधवांची संख्या भरपूर होती. अशा स्त्रीयांना वस्तीगृहात शिक्षण देऊन त्यांच्या शिक्षिका अगर धर्मोपदेशीका म्हणून वापर करून घेता येईल असेही या कार्यकर्त्यांना वाटत होते. या विचाराला अनुसरूनच स्त्री शिक्षणाच्या या प्रयोगाला समाजातील धनिकांनी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले गेले.[१४]

सुरूवातीस आश्रमची जागा स्वस्तिश्री जिनसेन मठात निवडली व हा आश्रम चालविण्यासाठी निटवेशास्त्री यांच्या भगिनी श्रीमती उमाबाई पाटील श्रीमती देविकाबाई सुलताने व तानिबाई बहिरशेठ यांनी काम करण्याचे मान्य केले. गरीब विधवांचा खर्च समाजाकडून करण्याचे ठरले. ही सर्व श्राविकाश्रम सुरवात करण्याची पूर्वतयारी झाल्यानंतर २१/१/१९०८ श्री जिनसेन भट्टारक महाराज यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेच्या

वार्षिक अधिवेशनात कोल्हापूर हे जैन वस्तीचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने तेथेच श्राविकाश्रम सुरू करावा. असा ठरावक केला. २१/१/१९०८ रोजी पंडिता मगनबाई यांच्या शुभहस्ते जैन श्राविकाश्रमाची सुरवात करण्यात आली या आश्रमामध्ये पहिल्यावर्षी श्रीमती उमाबाई तात्या पाटील कुंभोज, श्रीमतीबाई बापूराव कोकिळ, रमाबाई मोरुसे, सौ. ज्ञानमतीबाई लठ्ठे या दाखल झाल्या. सौ. गोदुबाई आदिराज उपाध्ये या आश्रमाच्या पहिल्या शिक्षिका झाल्या सौ. गोदुबाई आदिराज उपाध्ये या आश्रमच्या पहिल्या शिक्षिका झाल्या. मुलींची संख्या वाढू लागल्याने गोदुबाईंचे उपाध्ये पती आदिराज उपाध्ये शिक्षकाचे काम करू लागले. आण्णासाहेब लठ्ठेच्या पत्नी जानमतीबाई या दिगंबर जैन बोर्डिंग दसरा चौकातील बोर्डिंगमधून शिक्षणासाठी या आश्रमात येत असत. त्यासाठी या पाटी पेन्सील पदराखाली झाकून रोजदुपारी भर उन्हात २ मैलाचे अंतर पायी चालत येत. पुढे पुढे त्यांचे अनुकरण इतर जैन स्त्रीया करू लागल्या.[१५] १८४८ ला महात्मा जोतिबा फुलेंनी मुलींची शाळा सुरू केल्यावर सावित्रीबाई फुलेंनी जसे निष्टेनी स्त्री शिक्षणाचे काम केले तसेच लठ्ठेच्या पत्नी ज्ञानमतीबाई लठ्ठे या स्वत: शिक्षण घेऊन आपल्या पतीच्या कार्यात सहकार्य करू लागल्या.''

या आश्रमामध्ये तीन प्रमुख विभाग पाडून एक अध्यापिकांचा वर्ग करण्यात आला. त्यामध्ये विधवा अगर इतर स्त्रीया ज्या आश्रमच्या नियमाप्रमाणे अभ्यास करून पुढे शिक्षणाचे काम नियमित करतील त्यांचा समावेश होता. या स्त्रीयांसाठी मराठी भाषेचे ज्ञान, जैन धर्माची माहिती व त्याकरिता हिंदी व संस्कृत भाषेचा अभ्यास, हिंदूस्थानचा थोडक्यात इतिहास, भूगोलाची संक्षिप्त माहिती, व्यवहारापुरते गणित, शिवणकाम या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश केला तर दुपारच्या वर्गात घरची कामे सांभाळून शाळा शिकण्यास येणाऱ्या स्त्रिया होत्या. त्यांच्याकरिता मराठी भाषा जैन धर्म, साधारण हिशोब व शिवणकाम हे अभ्यासक्रम होते. तिसऱ्या वर्गात लहान मुलीचा समावेश होता. त्यांना मात्र सामान्य

मुलीच्या शाळेप्रमाणेच अभ्यासक्रम शिकवून जैन धर्माचा अभ्यास घेतला जाई. याप्रमाणे कोल्हापुरातील स्त्री वसतिगृहातील प्रयोग १९०८ मध्ये प्रत्यक्षात उतरविला. १९०५ मध्ये मुलींच्या वसतिगृहाची सुरूवात झाली होती. लगेचच तीन वर्षात मुलींच्या वसतिगृहाचा प्रयोग जैन समाजात केला. १९०७ मध्ये वीरशैव लिंगायत बोर्डिंगची सुरवात झाली. १९२० ला प्रिन्स शिवाजी फ्री मराठा बोर्डिंगची सुरवात झाली. या दोन्ही वसतिगृहांनी मुलींची वस्तीगृहे सुरू केली पण ती स्वातंत्र्योत्तर काळात त्यामुळे कोल्हापुरात स्त्री वसतिगृहाची सुरवात करणारे जैन श्राविकाश्रम कोल्हापूर हे पहिले वसतिगृह होते.

दक्षिण भारत जैन सभेने या आश्रमाच्या आर्थिक मदतीसाठी जैन समाजाला मदतीचे आवाहन केले. त्यामध्ये असे म्हणतात,

''हल्ली दारिद्र्यामुळे ज्या हजारो जैन विधवा आमच्या प्रांतात, मोलमजुरी (घरची अगर लोकांची) करून आपले जीवन दु:खात कंठीत आहेत. त्यांना ज्ञानदान देऊन त्यांचे आयुष्य अधिक पुण्यप्रद परोपकारी व उपयुक्त कामात खर्च करणे हे आमच्या समाजास अत्यंत हितकर आहे. शिक्षण दिल्याने गरीब विधवांना हल्लीप्रमाणे काबाडकष्ट करावे अगर पाट लावावा असा प्रसंग येतो, तो न येऊन त्यांना आपले मन उत्तम प्रकारच्या व्यवसायात गुंतवून समाधानाने निर्वाह करता येईल. पाटाची कल्पना त्यांच्या मनाला येणार नाही. शिक्षणाने उदर पोषण चांगले करता येऊ लागलेस पाटाचे कमीपणा पदरी येण्याचे कारण नाही. गरीब पण हुशार शिकु इच्छिणाऱ्या बायकांना निर्वाहाचा खर्च देऊन त्यांच्याकडून अभ्यास करावयाचा असून शिकल्यानंतर वेतन देऊन त्याच्याकडून जैन स्त्रीयामध्ये शिक्षणप्रसार करावा हा विचार आहे. तेव्हा आपण या सहकार्यास मदत करावी इतके सांगणे पुरे आहे.'' दानशूर सधन जैन समाजाला स्त्री शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याचे हे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आवाहन कोल्हापूर जैन विद्यालय येथून बापू आण्णा पाटील, आ. फ. चौगुले आण्णाप्पा चिवटे यांनी केले होते.[१६]

सन १९०८ मध्ये या श्राविकाश्रमाच्या इन्स्पेक्शन साठी जेव्हा दरबारचे लोक आले तेव्हा या आश्रमातील स्त्रिया बुजलेल्या गायीप्रमाणे आश्रमाच्या मागील बाजूस चिंचोळ्या जागेत उभ्या राहिल्या या स्त्रियांना पुरूषांच्या समोर उभे राहून आपण शिक्षण घेत आहोत हे सांगण्याचे धाडस नव्हते.[१७] द. भारत जैन सभेने या संस्थेचा विकास विद्यार्थी वस्तीगृह प्रमाणेच करण्याचा प्रयत्न केला. पण स्त्री शिक्षणाबद्दलची अनास्था तसेच स्त्रीयांना इथे राहण्यासाठी पाठवण्यापेक्षा जैन समाज तयार नव्हता त्यामुळे १९१० साली या श्राविकाश्रमध्ये फक्त १२ विद्यार्थ्यांनी होत्या. तसेच मुंबईचा आर. आर. श्राविकाश्रमे सुस्थितीत चालू असल्याने येथील मुलींना स्कॉलरशीप देऊन मुंबईत पाठविण्याची संचालकांनी ठरवले. पण या मुली मुंबईला गेल्या नाहीत त्यामुळे हा आश्रम बंद करण्याचा निर्णय घेतला गेला.१८ त्यानंतर गोदूबाई उपाध्ये व त्याचे पती पुण्याच्या मैनाबाई श्राविकाश्रमाचे व्यवस्थापक म्हणून काम करू लागले व कोल्हापूर, सोलापूरकडील मुली इथे राहून सेवासदन, फिमेल हायस्कुल व ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेऊ लागल्या.[१९]

पुण्याच्या मैनाबाई आश्रमात शिक्षण घेणाऱ्या कोल्हापूरच्या श्यामाबाई मोरुसे या पुण्याच्या फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये राहिल्या १९२३ ला कोल्हापूरला परत आल्या. याचकाळात आ. लठ्ठे, छ. शाहूंचे चरित्र लिहण्याच्या निमित्ताने व छ. राजाराम महाराजांचे सल्लागार म्हणून कोल्हापूरात वास्तव्य करू लागले. त्यांच्या प्रयत्नाने सभेच्या कार्यकर्त्यांनी १९२३ साली शाहुपूरीत भाड्याच्या जागेत हा महिलाश्रम पुन्हा चालू झाला. यासाठी आणखी एक महत्त्वाचे कारण होते ते म्हणजे आ. लठ्ठेंची मेहुणी श्रीमती कळंत्रे यांनी पुण्यातून शिक्षण करून १९२२ मध्ये सांगलीला त्यांनी जैन महिलाश्रमाची सुरवात केली होती.[२०]

दक्षिण भारत जैन सभेच्या महिला परिषदेची व महिलांश्रमाची माहिती त्यावेळी पुण्याच्या प्रसिद्ध समाजसेविका श्रीमती रमाबाई रानडे यांना मिळाली होती. कारण त्यांनी आपल्या दोन प्रतिनिधी महिला परिषदेचे काम पाहण्यासाठी पाठवल्या होत्या. त्या लिहितात. आपल्या भारतात धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक व औद्योगिक अशा प्रकारच्या अनेक संस्था स्थापन झाल्या तरी त्यांचा उद्देश एकच आहे. या सर्वांनी हातात हात घालून काम केले पाहिजे. कधी कधी आपला महिलाश्रम व महिला परिषद या विषयी कळवावे.[२१]

जैन पुरूष शिक्षण (१९११ ते १९२१)

| | १९११ | १९२१ |
|---|---|---|
| मुंबई इलाखा | १२० | १३८ |
| ब्रिटीश राज्य | १२१ | १४० |
| देशी संस्थाने | ११८ | १३४ |

जैन स्त्री शिक्षण (१९११ ते १९२१)

| | १९११ | १९२१ |
|---|---|---|
| मुंबई इलाखा | १४ | २४ |
| ब्रिटीश राज्य | १६ | २५ |
| देशी संस्थाने | ११ | २१ |

(जनगणना रिपोर्ट, १९११ ते १९२१)

संदर्भ : प्रगति आणि जिनविजय, ४-१-१९२३.

द. भारत जैन सभेने चालविलेल्या शिक्षण विषयक कार्यामुळे १९११ ते १९२१ च्या जनगणना रिपोर्टमध्ये महिलांची संख्या वाढलेली दिसून येते. ही महिलाश्रमाच्या व द. भा. जैन सभेच्या शिक्षण विषयक कार्याची पावती होय.[२२] १९०१ मध्ये मुंबई इलाख्यात ११५ महिला शिक्षित होत्या. ही संख्या १९२१ मध्ये १३८ वर पोहचली.

## कोल्हापूर श्राविकाश्रमाची इमारत :

सन १९२९ साली शाहूपुरीतील एका वाड्याच्या जागेत, सदर आश्रम चालू झाला स्वतंत्र जागेची आवश्यकता तीव्रतेने भासू लागली १९२७ साली कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांचेकडे लक्ष्मीपुरीतील जागा मागणीसाठी अर्ज करण्यात आला. स्व. आण्णासाहेब लट्ठे त्यावेळी कोल्हापूरचे दिवाण होते. अर्ज मंजूर झाला व दोन ब्लॉक छत्रपतींनी देणगी दाखल दिल्या. स्व. लट्ठे यांचे परिश्रम व मदत अत्यंत उपयोगी ठरले. लोकांकडून देण्याग जमवून १२ खणी इमारत बांधण्याचे काम सुरू झाले. या इमारतीचा कोनशिला समारंभ गूढी पाढव्याच्या शुभ मुहूर्तावर दि. २७/३/१९३३ रोजी श्री आदिराज देवेंद्र उपाध्ये यांच्या हस्ते झाला. आणि दि. १६/८/१९३४ नागपंचमीच्या मुहूर्तावर नवीन इमारतीत प्रवेश करण्यात आला. त्यावेळी कोल्हापूर दरबारने मोफत पाण्याचा नळ दिला व श्री भूपाळ आप्पाजी जिरगे यांनी स्वखर्चाने दिवाबत्तीची सोय करून दिली व कोल्हापूर महानगरपालिकेने आश्रमाच्या जागेत एक विहीर बांधून दिली व सक्रीय सहयोग दिला. सन १९३५/३६ साली स्नानगृह व सन १९४४ साली कंपाऊंड भिंत बांधण्यात आली.

सन १९६० साली वृद्धापकाळामुळे आपल्या हातून कार्य होत नसल्याने श्रीमती शामाबाई मोरुसे यांनी कोल्हापूर जैन बोर्डिंगचे द. भारत जैन सभेच्या ताब्यात रितसर कागदपत्रे करून आश्रम ताब्यात दिले. त्यानंतर लगेच बोर्डिंग फंडातून रु. ४५००/- खर्च करून चालू खोल्यांचे कौलारू इमारतीचे बांधकाम केले. सन १९६६ च्या सौ. डॉ. विजयालक्ष्मी पांगळ येथे कायमच्या रहाण्याकरिता आल्या. त्यांच्या वास्तव्यामुळे आश्रमात मुलींची संख्या वाढली आणि आश्रमला खऱ्या आश्रमाचे स्वरूप आले तेव्हा तेथेही जुन्या इमारतीवर माडी बांधून खोल्या बांधण्याची योजना बोर्डिंग चालकांनी आखली त्याप्रमाणे दि. ७/१२/१९६९ रोजी सौ. मरूदेवी धन्यकुमार जव्हेरी मुंबई यांच्या हस्ते कामास सुरूवात

झाली. वर्षभरात माडीवरील ६ खोल्या बांधून पूर्ण झाल्या. व त्याचे उद्घाटन सौ. ललिताबेन लालचंद दोशी यांच्या हस्ते दि. २४/१/७१ रोजी झाले याशिवाय उत्तर पूर्व बाजूला १९७४ च्या अखेरीस तीन मजली इमारतीचे बांधकाम हाती घेण्यात आले. त्याची सुरवात चंद्राबाई भुपाल आरवाडे रा. सांगली यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीमती राजमती नेमगौंडा पाटील, सांगली यांच्या शुभहस्ते झाला व इमारतीचे उद्घाटन समारंभ २९ मे १९७६ रोजी श्रीमतीबाई चारूदत्त कळंत्रे मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीमती कुसूमबेन, मोतीचंद शहा, मुंबई यांच्या शुभहस्ते झाला. या इमारतीसाठी १ लाख ६० हजार रुपये खर्च झाले. जैन सभेचे तत्कालीन अध्यक्ष स्व. तात्या पाटणे आणि विलास पाटील यांचे परिश्रम यासाठी उपयोगी पडले.[२३]

या श्राविकाश्रमाच्या विस्तारीकरणाच्या बांधकामाची योजना आखून १९८४ साली तत्कालीन चेअरमन बी. बी. पाटील यांच्या हस्ते १९८४ मध्ये पायाभरणी समारंभ होऊन १९८७ ला बांधकाम पूर्ण झाले यासाठी ५ लाख १० हजार रुपये खर्च झाले या इमारतीचा उद्घाटन समारंभ २० मार्च १९८८ रोजी डॉ. सौ. प्रतिभाताई अरविंद दोशी मुंबई यांच्या शुभहस्ते व माननीय आमदार सरोजनी खंजिरे यांच्या अध्यक्षतेखाली झाला.[२४]

आधुनिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षण ही काळाची गरज बनल्याने या श्राविकाश्रमाच्या संचालकांनी अनेक योजनांचा अभ्यास केला व महिलांच्या विकासासाठी १९८६ पासून शिवाजी विद्यापिठाच्या सहकार्याने मशिनवर लोकर विणकामाचे कोर्स सुरू करण्यात आले. लक्ष्मीपुरी सारख्या मध्यवर्ती ठिकाणी या व्यावसायिक शिक्षणाचा लाभ अनेक गरजू स्त्रियांनी घेतला. १९८८-९१ या काळात गरीब विद्यार्थीनीसाठी मोफत शिक्षण कोर्स ही राबविले आहे.[२५] इथे शिवणकलासही चालविले जाऊ लागले. याबरोबरच आदर्श बलमंदिर या संस्थेमध्येच चालवले जाते.

या इमारतीच्या नूतनीकरणानंतर विद्यार्थीनीसाठी अनेक कोर्सेस व खेळाची सुविधा निर्माण केली गेली. रिंग टेनिस, बॅडमिंटन यासारखे खेळ उपलब्ध केले गेले. डॉ. काचंन कापसे योगासनाचे क्लासही चालवितात. अध्यात्मिक वाचनाची आवड असणाऱ्या महिलांसाठी व शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी त्यांना आवश्यक विषयांच्या पुस्तकाचे सुसज्ज ग्रंथालय या महिलाश्रमात चालविले जाते. आधुनिक काळाला अनुसरून कॉट बेसीसची सोय, उत्कृष्ट जेवण यामुळे इंजिनिअरिंग, मेडिकल, लॉ इतर संस्थातून हे व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या इतर जातीच्या मुलीसुद्धा या आश्रमात राहतात. कमवा व शिका या योजनेखाली दरवर्षी ९ ते १० मुली या वस्तीगृहाचा लाभ घेतात त्यांच्याकडून स्वयंपाकाला मदत करणे, वाढणे, धान्य निवडणे, साफसफाई इ. कामे करून घेतली जातात. गरीब व निराश्रीत मुलींना शिक्षण देऊन त्यांना पायावर उभे करण्याचे काम आश्रमाच्या संचालिका, धनिकांच्या मदतीतून करतात. इमारतनिधी, भाऊबीज फंड, रक्षाबंधन फंड, गोफ करण्याचे काम सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांकडून करवून घेतले जाते. अशा स्वयंसेवी कार्यातून मुलींना दीड लाख रुपयांचा इमारत निधी गोळा केला आहे.[२६] या वसतीगृहातील मुलींच्या बौद्धीक विकासाच्या अनेक योजना राबविल्या जातात त्यामध्ये निबंधमाला स्पर्धा, चर्चासत्रे, सांस्कृतिक, धार्मिक, राष्ट्रीय वार्षिक स्नेहसंमेलन व विविध महिला स्पर्धा आयोजित केल्या जातात. तज्ज्ञ व्याख्याने बोलवून महिलांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. १९९६ पर्यंत हा महिलाश्रम दिगंबर जैन बोर्डिंग कोल्हापूर यांच्या अधिपत्याखाली व मार्गदर्शनाखाली चालवला जात होता. त्यानंतर या महिलाश्रमासाठी स्वतंत्र पदाधिकारी स्त्रियांच्या नेमणूक केल्या गेल्या आहेत.

## कोल्हापूर श्राविकाश्रमातील विद्यार्थीनींची संख्या :

कोल्हापूरात स्त्री शिक्षणाची सोय करण्याच्या हेतूने जैन महिलाश्रमाच्या सेक्रेटरी श्रीमतीबाई कळंत्रे यांचे अर्जानुसार सभेनेही लक्ष्मीपुरीतील जागा सुमारे १९२७ मध्ये मिळविली. पण श्री शामाबाई मोरूसे यांनी या आश्रमाला पुर्णत्वाला नेण्यासाठी प्रयत्न केले.[२७] या काळात येथे २२ मुली राहत होत्या. या आश्रमकडे सभेने अधिक लक्षपूर्वक व अधिक उपयुक्त करण्याचे पाहिले. ५० ते ६० च्या दशकामध्ये मुलींची संख्या ही जवळपास साधारणपणे ४० ते ५० या दरम्यान होती. थोड्या विद्यार्थिनी महाविद्यालयीन शिक्षण घेणारे होते व थोड्या लौकीक शिक्षण घेणाऱ्या होत्या.[२८] तसेच दिवसेदिवस विद्यार्थिनींची संख्या वाढतच चाललेली आहे. ६० ते ७० च्या दशकात विद्यार्थिनींची संख्या ५० ते ५५ इतकी होती. ७० ते ८० च्या दशकात विद्यार्थिनींची संख्या जवळजवळ ७० ते ७५ च्या दरम्यान गेली.[२९] लौकीक शिक्षणाव्यतिरिक्त शिवणकाम, भरतकाम, स्वयंपाक वगैरे गोष्टीचे शिक्षण दिले जाते. त्यानंतरच्या २० वर्षाच्या विद्यार्थीनींची संख्या अनुक्रमे खालीलप्रमाणे आहे.[३०]

| सन | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९८५-८६ | ७५ |
| १९८६-८७ | ७२ |
| १९८७-८८ | ७० |
| १९८८-८९ | ७६ |
| १९८९-९० | ८० |
| १९९०-९१ | ८० |
| १९९१-९२ | ८० |
| १९९२-९३ | ८५ |
| १९९३-९४ | ८२ |
| १९९४-९५ | ७० |

| | |
|---|---|
| १९९५-९६ | ७५ |
| १९९६-९७ | ७५ |
| १९९७-९८ | ७० |
| १९९८-९९ | ७० |
| २०००-२००१ | ७२ |
| २००१-२००२ | ७८ |
| २००२-२००३ | ८० |
| २००३-२००४ | ६५ |

### श्रीमती कळंत्रे आक्का जैन महिलाश्रम सांगली :

१९११ मध्ये कोल्हापूर येथील जैन महिलाश्रम महिलांच्या संख्येअभावी बंद झाला व तेथील मुली आश्रम सोडून निघून गेलया. १९२२ मध्ये द. भा. जैन सभेने साविकाश्रम सुरू करण्याचा दुसरा प्रयत्न सांगलीला केलहा हा प्रयत्न यशस्वी झाला तो म्हणजे श्रीमती कळंत्रे या महिलेच्या जिद्दीने व घेतलेल्या परिश्रमाने १८९६ आली श्रीमती कळंत्रे आक्काचं कुरुंदवाडच्या दुग्गे घराण्यात त्यांचा जन्म झाला. १९११ मध्ये त्यांचे लग्न चारूदत्त कळंत्रे यांच्याशी झाले. ५ महिन्यात कोल्हापूरात आलेल्या प्लेगच्या साथीने त्यांचे पती मृत्यू पावले. त्यानंतर १९१६ साली हिंगण्याला मैनाबाई श्राविकाश्रम सुरू झाला होता. प्रभातकार, वा. रा. कोठारी हे त्यांचे सचिव होते. आक्का तेथे शिक्षणासाठी गेल्या तेथून परत आल्यावर द. म. जैन सभेच्या सांगली येथील अधिवेशनात कळंत्रे आक्कानी जैन श्राविकाश्रम सुरू करण्यात यावा असा ठराव करून घेतला व ९/४/१९२२ रोजी गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर श्री धावते यांच्या बंगल्यात महिलाश्रम सुरू झाला.[११] त्यावेळी अवघ्या तीन महिला तेथे होत्या.

पहिल्याच दिवशी या महिलांना पुरणपोळीचा बेत जेवणासाठी आखला. तेथील स्वयंपाकीण सोनूबाई कापसे यांनी सर्वसमान आणले पण मिठ विसरले स्वयपाकीने शेजारहून उसने मीठ आणू का; आक्का म्हणाल्या, आश्रमच्या उद्‌घाटनाच्या दिवशी उसनवारी करून आपल्याला आश्रम कर्जबाजारी करायचा नाही' अशा ध्येयवादाने आश्रम सुरू केला. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतून ८ मुलींच्यावर शिक्षण वर्ग चालू केला. त्यांनी स्वत: घरोघर फिरून शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन मुली गोळा करून आश्रमात आणल्या. अशाप्रकारे मुलींची ४५ वर संख्या गेली तर त्यांनी सुरू केलेल्या शिक्षणवर्गातील मुलींची संख्या १२८ पर्यंत पोहोचली व शाळेत ४ थी ७ वी व इंग्रजी तिसरी पर्यंतचे वर्ग सुरू केले. त्यांच्या या कार्यात त्यांना सुरवातीस श्यामाबाई मोरूसे व श्रीमती कोकिळ यांनी मदत केली.[३२] त्यांच्या या कार्याचे कौतुक सांगलीच्या राणीसाहेब सरस्वती देवी राणी सरकार यांनी केले.

सांगलीला महिलाश्रम सुरू झाल्याबरोबर अशा समस्येची आवश्यकता विषद करून सांगणारे व तिचा उपयोग करून घेण्याचे स्त्रियांना आवाहन करणारे एक कळकळीचे निवेदन पत्र आश्रमाच्या संचालिका कळंत्रे यांनी काढले. "पुरूष शिक्षणापेक्षा स्त्री शिक्षणाची जास्त जरुरी आहे. मुलीच्या शिक्षणाबद्दल पुरूष जशी काळजी घेतात तितकीच काळजी मुलीच्या शिक्षणाची त्यांनी घेतली पाहिजे कारण अपत्य संगोपनाचे एवढे जबाबदारीचे काम सोपविले आहे. तिला अक्षरशत्रु असू देणे हे तुम्हाला योग्य वाटते का?"[३३]

एका बाजूस ज्ञानाचा मुळीच गंध नाही व दुसऱ्या बाजूस मोठमोठ्या विद्यालयात शिकून हव्या त्या पदव्या संपादण्याची व पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करण्याची सदर परवानगी अशी जी विलक्षण स्थिती सांप्रतकाळी आमच्या जातीत दिसत आहे. त्यावरून अनुमानाकरिता पुरूषांप्रमाणे स्त्रियांना ज्ञान मंदिराची दारे आज नाही उद्या तरी खुली करून यावी लागणार हे ध्यानात आणून आमच्या द. म. जैन सभेच्या चालक बंधूकडून मुलांच्या

शिक्षणाप्रमाणे मुलीच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून गेल्या नवमीस सांगली मुक्कामी आश्रम उघडण्यात आला आहे.

द. भारत जैन सभेच्या स्त्री शिक्षण विभागाचे सेक्रेटरी शामगौडा रायगौंडा पाटील या महिलाश्रमाच्या उभारणीसाठी खूप प्रयत्न केले. त्यांनी द.भ.जै.स. आश्रयाखाली चाललेल्या श्राविकाश्रमासाठी नियम करून ते प्रसिद्ध केले.

१) ''या आश्रमाचे मुख्य उद्देश जैन स्त्री समाजात धार्मिक व व्यावहारिक ज्ञानाचा प्रसार करणे.

२) या आश्रमाची व्यवस्था चांगली राहण्याकरिता एक कमेटी नेमली आहे व आश्रमची व्यवस्था पाहण्याकरिता व शिकविण्याकरिता हेड बाई नेमली आहे. सदरबाई आश्रमामध्ये रात्रदिवस राहते.

३) आश्रममध्ये जैन धर्माप्रमाणे चालणाऱ्या स्त्रीया घेतल्या जातील.

४) आश्रमच्या खर्चाने राहणाऱ्या स्त्रियांनी अभ्यस पूर्ण झाल्यानंतर तीन वर्षे सभेची कमिटी सांगेल त्या धार्मिक प्रचारासाठी काम केले पाहिजे व आश्रमाची रक्कम घेतली असेल ती हप्त्याने फेडली पाहिजे.

सदर आश्रमाचा फायदा आमच्या विधवा भगिनीनी अवश्य घ्यावा अशी विनंती आहे. आश्रमात केव्हाही मुलींना दाखल करून घेतले जाते. सर्व धार्मिक गोष्टीत ज्ञानाला प्राधान्य दिले आहे. विधवा झालेल्या स्त्रीयांनी आपले जन्माचे साफल्य करण्याचे झाल्यास सदर आश्रमात येऊन धार्मिक ज्ञान करून घेतले पाहिजे. स्त्रीयांची उन्नती झाल्याशिवाय पुरूषाची उन्नती होणार नाही तेव्हा आपल्या समाजात स्त्री शिक्षणाचा फैलाव झाल्याशिवाय निरक्षरता कमी होणार नाही तेव्हा प्रत्येकांनी आपल्या घरातील स्त्रीयांना आश्रममध्ये पाठवून त्याचा लाभ घ्यावा.''[३४]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## सांगली श्राविकाश्रमाची इमारत :

द. भारत जैन सभा व कळंत्रे आक्का यांच्या प्रयत्नाला यश येऊन महिलाश्रमाची प्रगती होत गेली. येथे प्रौढ स्त्रीयांची व मुलींची राहण्याची सोय फी देऊन किंवा मोफत करण्यात आली होती. येथे सुरू असलेले वर्ग सर्व जातीच्या मुलींना व स्त्रीयांना खुले ठेवण्यात आले. त्यामुळे १९३४ साली मुलीची संख्या वाढली व नवीन इमारतीची गरज भासू लागली म्हणून १९३४ साली वखार भागातील सध्याची आश्रमची जागा १२०००/- रुपयास दक्षिण भारत जैन सभेने खरेदी केली त्यासाठी बळवंतराव धावते, बाबगोंडा पार्सल, भाऊ पाटील भाऊसाहेब कुरळे, औरवाडे बंधू इत्यादीनी मदत केली.[३५]

१९७७-७८ साली १ लाख १३ हजार रुपये खर्च करून या आश्रमामध्ये नवीन ८ खाल्या २ हॉल, ४ स्नानगृहे, २ संडास याचे बांधकाम पूर्ण झाले त्यावर केशवराव चौगुले, बापुसाहेब चौधरी, लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी विजय खाडे यांनी बांधकामात लक्ष घातले, १९८८-९२ या काळात अंतर्गत सुविधा म्हणून मुलीसाठी नवीन टेबल-खुर्ची फर्निचर ट्यूबलाईट बसवण्यात आले.

त्यानंतर स्वतःची जागा मिळाल्याने आश्रमची पुढील प्रगती जोमाने झाली १९३६ साली आश्रमाच्या शाळेत प्राथमिक शिक्षणाबरोबर इंग्रजी शिक्षणासाठी सोय करण्यात आली. त्यामुळे मुलीची संख्या वाढली व शाळा सरकारी झाल्याने रजिस्टर ग्रँटही मिळू लागले.[३६]

## श्राविकाश्रमाचे स्वातंत्र चळवळीत सहभाग :

सांगलीच्या महाराणीच्या मदतीने कळंत्रे आक्काच्या कामाचा व्याप वाढू लागला. सांगलीतील महिला परिषद साक्षरता प्रसार व बालसंगोपन स्वच्छता संगोपन यासाठी करीत होती. या आश्रमात राहूनच त्यांनी कॉंग्रेस संघटनेच्या वतीने स्त्रियांसाठी विधायक कार्याला

सुरवात केली. ज्यामध्ये महिलाश्रमाच्या विधायक महिलाही सामील झाल्या मोठ्या प्रमाणात कापूस रोक ठोक भावाने खरेदी करून त्यातील सरकी काढण्याचे काम व पिंजण्याचे काम महिलाकडून केले. त्यांचे वेळू काढून ते वृद्ध स्त्रियांना देत. वृद्ध स्त्रियांनी दिलेले कापूस देऊन सुबक कादी करून ती योग्य दराने देत महिलांच्या या स्तुत्य उपक्रमांना काम व रोजगार मिळाला. स्वातंत्र्यापर्यंत बरेच वर्षे हा व्यवसाय ना नफा ना तोटा होता. महिलांना आर्थिक, सबलता येण्यासाठी महिलाश्रमातून चालविला जाई. १९३४ साली बोरीवलीच्या नानांनाही बागेत गांधीच्या नेतृत्वाखाली भरलेल्या शिबिरात कळंत्रे आक्कांनी भाग घेतला. त्यामधून स्त्रियांशिवाय देशाची उन्नती होऊ शकणार नाही. घरात कोणी निरसा राहणार नाही याची दक्षता घेणे, असे गांधीचे अनेक संदेश शिकून आल्या व या गोष्टी त्यांनी महिलाश्रमातील महिलांना शिकविल्या. त्यांनी ब्रह्मदेशचा १९३४ मध्ये दौरा केला. त्यामुळे त्यांच्या या अनुभवाचा फायदा सांगली आश्रमातील महिलांना झाला.[३७]

या महिलाश्रमात इंग्रजी शाळेबरोबरच महात्मा गांधी शिशूविहार ही पूर्वप्राथमिक शाळा सुरू झाली होती. १९४८ साली कस्तूरबा अध्यापिका विद्यालय, प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देणारे कॉलेज काढून या महिलाश्रमाने सांगलीतील स्त्री शिक्षणाच्या प्रसाराच्या कार्याला चालना दिली. त्यामुळे १९५० मध्ये महिलाश्रमांतर्गत जैन स्त्रियांसाठी वस्तीगृहे त्याचबरोबर सर्व धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाळा, महात्मा गांधी शिशूविहार कस्तूरब अध्यापक विद्यालय असे विभाग सुरू झाले.

१९४८ साली सुरू झालेल्या ट्रेनिंग कस्तुरबा ट्रेनिंग कॉलेजमध्ये सांगली रत्नागिरी कोल्हापूर, सातारा भागातून मुली रहात असत. तेथे सुरूवातीला आप्पा शिराळकर आणि त्यानंतर उषाताई मगदूम या प्राचार्य म्हणून काम करीत होत्या.[३८]

१९५३ मध्ये लठ्ठे एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यास श्रीमती कळंत्रे आक्का यांचा फार मोठा होता. त्यांना प्रत्यक्ष शिक्षण देणारे महिला सभा अंतर्गत असणारे तीला विभाग लठ्ठे एज्युकेशन सोसायटीला जोडले. लठ्ठे एज्युकेशन संस्था सांगलीतील एक अग्रगण्य संस्था म्हणून मान्यता पावली. त्यानंतर सांगलीचा महिलाश्रम फक्त महिला वसतिगृहाचे काम पाहू लागला.

सांगलीमध्ये शिक्षणसंस्थांची वाढ झाल्यानंतर ग्रामीण भागातील मुलींना जागा अपुरी पडू लागल्यामुळे ७२ ते ७४ मध्ये या इमारतीवर दुसरा मजला बांधला. १९७४ साली या आश्रमात ६५ मुली होत्या. त्यापैकी ५ मुलींचा जेवणखान व शिक्षणाचा खर्च याच आश्रमतर्फे केला जात असे. मुलींना प्रत्यक्ष शिक्षण देण्याचे काम लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेनंतर बंद झाले त्यामुळे 'जैन महिलाश्रम सांगली' ही संस्था 'जैन श्राविकाश्रम सांगली' म्हणून ओळखली जाऊ लागली. १९८५ च्या मिटींगमध्ये या महिलाश्रमाचे नाव बदलून ज्या आधुनिक विचाराच्या स्त्रीने हा आश्रम उभारला वाढवला. तिच्या कार्याची आठवण म्हणून या आश्रमचे नाव श्रीमंतीबाई कळंत्रे जैन महिलाश्रम असे देण्यात आले. २ जाने १९८६ ला राजस्थानचे राज्यपाल माननीय वसंतदादा पाटील यांच्या शुभहस्ते सांगलीच्या माजी आमदार श्रीमतीबाई कळंत्रे यांच्या उपस्थितीत भव्य समारंभात या आश्रमाचे नामकरण करण्यात आले. १९९५ मध्ये या स्त्रीने आपल्या कर्मभूमीत म्हणजेच स्वत: निर्माण केलेल्या शिक्षण केंद्रात व महिलाश्रमात देहत्याग केला. त्यांची स्मृती सर्वांना नेहमीच रहावी यासाठी रत्नाकर बँकेच्या सहकार्याने सांगली नगरपालिकेकडे प्रयत्न करून या सांगली श्राविकाश्रम रस्त्यास श्रीमती कळंत्रे आक्का मार्ग हे नाव देण्यात आले.[३१]

## सांगली श्राविकाश्रमातील विद्यार्थिनीची संख्या :

आश्रमात प्राथमिक व दुय्यम शिक्षण घेण्यासाठी ५१ विद्यार्थीनी राहत आहे. या शिवाय प्राथमिक शिक्षण देणारी एक शाळा चालविली जात असून शाळेत सर्व जातीच्या व धर्माच्या मिळून २६० पर्यंत मुली शिक्षण होत होत्या. ५० ते ६० च्या दशकामध्ये मुलींची संख्या ही जवळपास साधारणपणे ४० ते ५० या दरम्यान होती थोड्या विद्यार्थ्यींनी महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या होत्या व थोड्या लौकिक शिक्षण घेणाऱ्या होत्या.[४०] तसेच दिवसेदिवस विद्यार्थीनींची संख्या वाढतच चाललेली आहे. या ६० ते ७० च्या दशकात विद्यार्थीनीची संख्या ५० ते ५५ इतकी होती.[४१] ७० ते ८० च्या दशकात विद्यार्थीनीची संख्या जवळ जवळ ७० ते ७५ या दरम्यान गेली.[४२]

विद्यार्थिनी संख्या १९८५-२०००[४३]

| सन | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९८५-८६ | ७० |
| १९८६-८७ | ७० |
| १९८७-८८ | ७२ |
| १९८८-८९ | ८५ |
| १९८९-९० | ९० |
| १९९०-९१ | ९५ |
| १९९१-९२ | १०० |
| १९९२-९३ | १०० |
| १९९३-९४ | १२५ |
| १९९४-९५ | १२५ |
| १९९५-९६ | १०० |
| १९९६-९७ | ७५ |

| | |
|---|---|
| १९९७-९८ | ७५ |
| १९९८-९९ | ७५ |
| २०००-२००१ | ७० |
| २००१-२००२ | ६५ |
| २००२-२००३ | ७० |
| २००३-२००४ | ६५ |

### ३) स्वर्गीय सौ. सुमनबाई राजाभाऊ काला मुलींचे वस्तीगृह औरंगाबाद :

द. भा. जैन सभेचे कार्यक्षेत्र १८९९ पासून प्रामुख्याने द. महाराष्ट्रातील कोल्हापूर सांगली व उत्तर कर्नाटकातील बेळगांव व धारवाड जिल्ह्यातून पसरलेले १९६३ मध्ये द. भा. जैन सभेची घटना विस्तृत करण्यात आली. त्याचवेळी द. जैन सभेचे कार्यक्षेत्रही वाढू लागल्याने द. म. जैन सभा हे नाव बदलून द. भा. जै. सभेच्या अधिवेशनाथ वीर सेवादल या युवक संघटनेचा द. भा. जैन सभेत समावेश झाला. त्यामुळे द. भारतातील युवकांचे सभेला मोठे योगदान मिळू लागले होते. निरनिराळ्या ठिकाणी होणाऱ्या जैन धर्मियाच्या धार्मिक, सामाजिक कार्यक्रम या युवक संघटनेने फार मोठे योगदान दिले. अशा महोत्सवाच्या निमित्ताने हे वीर सैनिक भारताच्या वेगवेगळ्या भागात जाऊन पोहचले त्यामुळेच महाराष्ट्र औरंगाबाद, पुणे, मुंबई तसेच कर्नाटकातील श्रवणबेळगोळ इ. ठिकाणी सभेच्या कार्याविषयी आस्था वाटू लागली. याचाच एक परिणाम म्हणून १९९५ मधील इचलकरंजी येथील 'अधिवेशनात मुंबई, पुणे, मराठवाडा या विभागाची विभागीय मंडळे स्थापन करण्याचे ठरले. त्यामुळेच या भागात सभेच्या कार्यक्षेत्राचा विकास झाला.

औरंगाबाद येथील सी श्रीपालजी गंगवाल हे सभेचे कार्यकर्ते सतत द. भा. जैन सभेकडे सभेच्या कार्याचा विस्तार औरंगाबाद जवळपासच्या बीड, परभणी, जालना करावा

या भागातील जैनांसाठी सभेने कार्य करावे अशी मागणी करत होते. औरंगाबाद शहरात मूलींचेसाठी अनेक महाविद्यालये शाळा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असले तरी जैन मुलींसाठी स्वतंत्र असे वस्तीगृह नव्हते. त्यामुळे श्रीपालजी गंगवाल यांनी द. भा. जै. सभेच्या जयसिंगपूर येथील जून १९९६ मध्ये भरलेल्या अधिवेशनात औरंगाबाद येथे मुलींच्या वस्तीगृहाचा प्रस्ताव सादर केला. त्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगावचे दातार श्री राजाभाऊ काळा यांनी आपल्या स्मरणार्थ ११ लाख रुपयांची देणगी जाहिर केली. त्यामुळे हे वस्तीगृह प्रत्यक्षात येऊ शकले. सुरूवातीच्या काळात इमारतीचा प्रश्न श्रीपालजी गंगवाल स्वत:करिता बांधलेली तीन मजली इमारत १ वर्षासाठी विनामोबदला सभेसाठी सुपूर्त केली. त्याच्या उदार आश्रयाने १८ जुलै १९९६ ला स्वर्गीय सौ. सूमन राजाभाऊ काला मुलींचे वस्तीगृहे सुरू झाले व २२ मुलींनी पहिल्या वर्षी प्रवेश घेतला. श्रीपालजी गंगवाल व चंद्रकांत साहुजी यांच्या प्रयत्नाने अरिहंत नगर या जैन वस्तीच्या मध्यावर जागा खरेदी केली. या जागेवर प्रत्येक खोलीसाठी सहा दातारांनी प्रत्येकी ३१,००० रु. दान देऊ केले. जून ९७ नंतर १०,००० स्क्केअर फुटाचे ३ मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आणि २००० पासून महिलाश्रम स्थलांतरीत झाली.[४४]

### श्रीमती सुशिलाबाई सदलगे जैन श्राविकाश्रम कागल :

कागल या कर्नाटक महाराष्ट्र सीमेवरील महत्वपूर्ण ठिकाण आहे. श्री. सुशिलाबाई सदलगे हिने स्वत:च्या मालकीची १८ खोल्यांची इमारत द. भा. जैन सभेला महिला वस्तीगृहासाठी नोव्हे. १९९९ ला दान दिले. या ठिकाणी २ जाने. २००० ला महिलाश्रमाची सुरवात झाली. त्यासाठी तेथील स्थानिक कार्यकर्ते डॉ. एन. एस. चौगले, डॉ. श्री व सौ ए. बी. होसकल्ले श्री विलास व सौ अनुराधा मगदूम, चौगुले गुरूजी इत्यादीचे योगदान

महत्त्वपूर्ण आहे. जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना हुपरी, किसान अहिर साखर कारखाना वाळवा, इ. च्या सहकार्याने या आश्रमची प्रगती चालू आहे.[४५]

**जैन श्राविकाश्रम पूणे :**

सभेचे कार्यकर्ते रत्नकांत फडे यांच्या नेतृत्वाखाली सौ. शैलाताई चौगुल नलिनीताई घाळी, लताशाह, श्री मिलिंद फडे यांच्या सहकार्याने पुण्यात मुलींचे वस्तीगृह चालू करण्याच्या सभेच्या संकल्पनेला १९९० मध्ये मूर्त रूप मिळाले. सुरवातीस ४ मुलींनी प्रवेश घेतला. हा आश्रम नेहमीच आर्थिक अडचणीत राहिला. पुण्यातील महागाईमुळष स्वतःची जागा खरेदी करणे शक्य झाले नाही. शासकीय जागेसाठी कार्यकर्त्यांनी बरेच प्रयत्न केले. परंतु जागेअभावी हा आश्रम १९९३-९४ मध्ये चालवणे अडचणीचे झाले व येथील सर्व सामान १९९६ मध्ये सूमतीबाई काला वस्तीगृहासाठी स्थलांतरीत केले. पुण्यासारख्या विद्येचे माहेरघर असलेल्या ठिकाणी मुलींच्यासाठी वस्तीगृहाची कल्पना मूर्त रुपात आणू शकली नाही.[४६]

२० व्या शतकात दक्षिण भारत जैन सभेने स्त्रीयांच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न केलेले दिसून येतात. मुलींच्या श्राविकाश्रमाची कल्पना १९०८ मध्ये जैन श्राविकाश्रम कोल्हापूर येथे मूर्त रुपात आली. काही कारणास्तव हे महिला वस्तीगृह बंद पडले. पण स्त्री व पुरूष कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने १९२२ ला सांगली येथे व १९२३ ला कोल्हापूर येथे पुन्हा महिलाश्रमाची स्थापना करण्यात आली. कोल्हापूर, सांगली येथील महिलाश्रम आजही स्त्रियांसाठी ज्ञानदानाचे उत्कृष्ट कार्य करीत आहे. १९९० च्या दशकामध्ये औरंगाबाद आणि कागल येथे महिलाश्रमाची स्थापना दक्षिण भारत जैन सभेने केली. पुणे येथील महिलाश्रमाचा प्रयोग मात्र अयशस्वी झाला.

**संदर्भ सूची :**

१) डॉ. विलास संगवे, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, पृष्ठ ३०-३१.

२) प्रगती आणि जिनविजय, ४/१/१९२३.

३) सौ. तानीबाई आरवाडे, सत्यवादी संपा. यांनी प्रसिद्ध केलेले भाषण 'स्त्री विभाग' सत्यवादी, ४/११/१९३७, पृ. ४.

४) सौ. शारदातनया, 'स्त्री शिक्षणाला छ. शाहू महाराजांनी दिलेले उत्तेजन', सत्यवादी, ११/११/१९३७, पृ. २०

५) हुजूर ठराव बुक्स, पृ. ६९८, १९१३; कोल्हापूर स्टेट ॲडमिनीस्ट्रेटीव्ह रिपोर्ट, १९१३-१४, पृ. ५६.

६) प्रगती आणि जिनविजय, १९११.

७) डॉ. पी. ए. पाटील, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ,१९८६, पृ. ७८.

८) विसाव्या शतकातील जैन समाजसेविका, बा.भु. पाटील ग्रंथ प्रकाशन मंडळ, सांगली, २००१, पृ. १०-११.

९) डॉ. पी. ए. पाटील, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ,१९८६, पृ. ७८-७९.

१०) श्री जिनविजय, एप्रिल, १९०५.

११) श्री जिनविजय, जानेवारी, १९०६, पृ. ४

१२) कित्ता, पृ. ५

१३) दक्षिण भारत जैन सभेचे २५/१/१९०६ चे स्त्री शिक्षणविषयक निवेदन, श्री जिनविजय, जाने. १९०६, पृ. ६.

१४) श्री जिनविजय, मे, १९०७, पृ. ७.

१५) प्रगती आणि जिनविजय, १५/१/१९३५, पृ. ४.

१६) डॉ. विलास संगवे, उपरोक्त, पृष्ठ १४५-४८.

१७) य.दि. फडके, आण्णासाहेब लठ्ठेंचे चरित्र, पृ. ६२.

१८) दक्षिण भारत जैनसभेचा वार्षिक अहवाल, १९१८.

१९) सौ. ऋतुजा खोत, उपरोक्त, पृ. ५६.

२०) कित्ता, पृ. ६०.

२१) रमाबाई रानडे यांचे आण्णासाहेब लठ्ठे यांना पत्र, दि. १२/२/१९२१.

२२) प्रगती आणि जिनविजय, ४/१/१९२३.

२३) प्रगती आणि जिनविजय, १४/३/१९८८, पृ. ८.

२४) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास (१९७६ ते २०००), पृ. १४४.

२५) कित्ता, पृ. १४५

२६) कित्ता, पृ. ३८

२७) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९४४-४५.

२८) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९६४-६५.

२९) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९७६-७७.

३०) जैन महिलाश्रम, कोल्हापूर, विद्यार्थीनी रिजिस्टर पत्रक, १९८५ ते २००४.

३१) श्री. पांडुरंग काळे, 'कर्मयोगिणी श्रीमतीबाई कळंत्रे आक्का', आर.आर. श्राविकाश्रम, मुंबई, १९७६. पृ. २९.

३२) कित्ता, पृ. ३०.

३३) डॉ. संगवे, उपरोक्त, पृ. २०१.

३४) कित्ता, पृ. २००२-०३.

३५) पांडुरंग काळे, उपरोक्त, पृ. ३७.

३६) डॉ. संगवे उपरोक्त, पृ. २०५.

३७) पांडुरंग काळे, उपरोक्त, पृ. ४२-४९, ५३.

३८) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास (१९७६ ते २०००), पृ. १४७-१४८.

३९) पांडुरंग काळे, उपरोक्त, पृ. ५३.

४०) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९५४-५५.

४१) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९६४-६५.

४२) दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९७६-७७; दक्षिण भारत जैन सभेचा वार्षिक अहवाल, १९७७-७८.

४३) सांगली महिलाश्रम विद्यार्थीनी रजिस्टर पत्रक १९८५-२००४.

४४) डॉ. पद्मजा पाटील, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास (१९७६ ते २०००), पृ. १५१.

४५) कित्ता, पृ. १५२

४६) कित्ता, पृ. १४९-१५०